
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg No. PNC-116. Licence No. 34

वर्ष ४०  पुणे. बुधवार, ३ आणि १७ जुलै. १९७४  अंक १३ आणि १४

## आपली इच्छा




आपण जे मिळविले त्याचा उद्देश आपल्या कुटुंबियांना सुखसमाधान प्राप्त करून देणे हाच असतो. त्यासाठी केलेली व्यवस्था आपल्या इच्छेनुसार व्हावी व चालावी अशी आपली अपेक्षा असणारच आणि ती रास्तच आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र या आपल्या बँकेशी संलग्न असलेली महाराष्ट्र एक्झिक्यूटर ट्रस्टी कं. लि. ही संस्था आपली अपेक्षा पूर्ण करेल; इतकेच नव्हे तर आपण केलेल्या कोणत्याही विश्वस्त निधीची व्यवस्थाही ही संस्था तितक्याच काळजीपूर्वक व जाणीवेने करेल.

आपले काम कोणतेही असो, 'इच्छापत्र' असो वा 'विश्वस्त निधी', आमची संस्था ते उत्तम रीतीने पार पाडेल व तेही अत्यल्प दरात.

आजच आमच्या संस्थेला आपल्या इच्छापत्राचे व्यवस्थापक वा आपल्या विश्वस्तनिधीचे विश्वस्त नेमून काळजी मुक्त व्हा.

## आमची सेवा




अधिक तपशीलासाठी संपर्क साधा :

**महाराष्ट्र एक्झिक्यूटर अँड ट्रस्टी कंपनी लि.**

*(बँक ऑफ महाराष्ट्रची संलग्न संस्था)* ११७८, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२

TOM & BAY/BM 7423 M

# नहीं —
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूर्वी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और कितनी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और कार्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना बदला मिल जाता है।

हमारे दूसरे विभाग हैं: १. संग्रहीत द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३०२ कारखाना: ४५४१०२

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ३ आणि १७ जुलै, १९७४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

---

### सावधान : जागतिक मंदी वाटचाल करीत आहे

जगाच्या आजच्या चित्राबद्दल अनेक देशांतील विचारवंतांना चिंता वाटत आहे. राजकीय अस्थैर्य, आर्थिक दुरवस्था आणि त्यांतून निर्माण झालेले बिनतोड सामाजिक पेचप्रसंग ह्यांची सावली बड्या देशांवर सुद्धा पडलेली आहे. तेव्हा आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या पण विकासाची धडपड करीत असलेल्या देशांतील स्थिती अपवाद असणे संभवतच नाही. जिनीव्हा येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेपुढे ह्यासंबंधी विचारासाठी ठेवण्यात आलेला अहवाल ह्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. संघटनेचे सरसंचालक मि. फ्रन्सिस ब्लँचार्ड ह्यांनी तो तयार केलेला आहे. ते म्हणतात की सर्व जगाला मंदीचा फटका बसण्याचा संभव निर्माण झालेला आहे. ह्या धोक्याला तोंड देण्यासाठी जगातील सर्व देशांनी सध्यापेक्षा अधिक प्रमाणात सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. जगांतील जे देश कच्च्या मालाचे उत्पादन करतात त्यांनी आपल्या उत्पादनाची गती मंद केली तर आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगति ह्यांच्यावर गंभीर परिणाम होतील. त्यातच अनेक देशांत चलनवाढीने चिंता वाटण्याइतके मोठे प्रमाण धारण केलेले आहे. जगातील देशांच्या चलनव्यवस्थेविषयी अनिश्चितता निर्माण झालेली आहे. शिवाय जागतिक मजूर चळवळींचे भवितव्यही अस्पष्ट झालेले आहे. देशांच्या भौगोलिक मर्यादा ओलांडून व्यापार, उद्योगधंदे करणाऱ्या कंपन्याही अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडलेल्या आहेत. त्यातच हवा, पाणी आणि भूमी ह्यांच्या दूषितीकरणामुळे अनेक देशांत नव्या समस्या उभ्या राहिल्या आहेत.

अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने रोजगारी निर्माण करण्याचा आपला कार्यक्रम कृतीत उतरविला पाहिजे. ग्रामीण भागांतील लोकांच्या रोजगारीकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले पाहिजे. कारण, अविकसित देशांच्या एकूण लोकसंख्येपैकी फार मोठा हिस्सा ग्रामीण भागांतच पसरलेला आहे. विकसनशील देशांच्या ग्रामीण भागांतील लोकांपैकी ७·५ कोटी लोकांना तरी रोजगार उपलब्ध नाही. त्याशिवाय सुमारे ३० कोटी लोकांना जेमतेम अर्धवेळ रोजगार मिळत आहे. एका दृष्टीने त्यांचा प्रश्न फारच मोठा मानावा लागेल. त्यांना पूर्ण रोजगार देण्याचा प्रश्न अधिकच बिकट आहे. आज जगांत सर्वत्रच कच्च्या मालाचा व इंधन साधनांचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यांचा पुरवठा कसा करीत राहावा आणि त्यांच्या वाढत्या किमती वाजवी पातळीवर राखण्यासाठी काय करावे, असा यक्ष प्रश्न निर्माण झालेला आहे. ह्या दोन्ही प्रश्नांची नीट सोडवणूक न झाल्यास सर्वच जगात रोजगारीच्या उपलब्धतेवर अतिशय वाईट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. मुळातच रोजगारीच्या प्रश्नाने जटिल स्वरूप धारण केलेले आहे. कच्च्या मालाचा व इंधनाचा पुरवठा न सुधारल्यास त्याची तीव्रता अधिकच वाढेल. जे देश तेलाच्या आयातीवर अवलंबून आहेत, त्या देशांतील बेकारी झपाट्याने वाढू लागेल. आजच जगातील उद्योगप्रधान देशांतूनही वाढती बेकारी बोकाळत चालली आहे. त्यांनी योजलेल्या उपायांनी ती भडकण्यास मदतच होत आहे. तरी पण तेलाची आयात करणाऱ्या देशांतील कामगारांना सर्वात जोराचा फटका बसणार आहे. कारण इंधनाच्या अभावी कारखान्यांची चक्रे थांबण्याची शक्यता आहे.

### भांबावून गेलेले जगातील अर्थशास्त्रज्ञ

जगातील आर्थिक परिस्थितीचे निदान करण्याच्या बाबतीत मोठमोठ्या अर्थशास्त्रज्ञांना अपयश येत आहे. त्यांच्यापैकी काही ही गोष्ट कबूलही करीत आहेत. प्रो. गालब्रेथ म्हणतात की, जगात सध्या अर्थशास्त्र ज्या पद्धतीने शिकविण्यात येत आहे आणि राबविण्यात येत आहे त्यावरून असे स्पष्ट दिसते की जे प्रश्न सोडविण्यासाठी अगर ज्यांची तीव्रता कमी करण्यासाठी अर्थशास्त्र वापरण्यात येते त्याचे मूळ स्वरूपच त्या शास्त्राला आकलन झालेले नाही. व्यावहारिक प्रश्न आणि अर्थशास्त्रीय विचार ह्यांचा काही संबंधच राहिलेला दिसत नाही. प्रिन्स्टन विद्यापीठात फिटस मॅचलुप नांवाचे विख्यात अर्थशास्त्रज्ञ आहेत. किमतीच्या अर्थशास्त्रात ते तरबेज गणले जातात. ते म्हणतात की जगातील चलनवृद्धीचा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या जवळ काहीही तोडगा नाही. पीटर बर्नस्टाइन हे प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ तर ह्याहीपुढे गेले आहेत. ते म्हणतात की, जगाचे आर्थिक भवितव्य काय असा प्रश्न विचारण्याची आता सोयच उरलेली नाही. उलट, अर्थशास्त्रज्ञांना काही आडाखे बांधता येतील किंवा नाही असाच प्रश्न उपस्थित झालेला आहे. एकोणिसाव्या शतकात अर्थशास्त्राला असाधारण महत्त्व प्राप्त झाले. १९३० सालच्या मंदीत सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी काही नवे अर्थशास्त्रीय विचार औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांत पुढे आले. आज मात्र आर्थिक अरिष्टाच्या भोवऱ्यात गटांगळ्या खाणाऱ्या जगाला अर्थशास्त्रज्ञ काहीही दिलासा देऊ शकत नाहीत. थॉमस कार्लाईल ह्या ग्रंथकाराने अर्थशास्त्राचे दुःखदायक शास्त्र अशा आशयाचे वर्णन केलेले आहे. त्याचे वर्णन आज आठवल्याशिवाय राहात नाही.

## रिझर्व्ह बँक उघड्या डोळ्यांनी पाहात असलेले नियमभंग बँका दंड कसा चुकवतात !

बँकांनी आपल्या ठेवींच्या मानाने जास्त कर्जे देऊ नयेत, ह्यासाठी रिझर्व्ह बँकेने बँकांवर बंधन घातलेले आहे– त्यांनी आपल्या ठेवींच्या ७% इतकी रक्कम रिझर्व्ह बँकेत ठेवली पाहिजे. (२८ जून पासून ५%). त्यापेक्षा जेवढी रक्कम कमी ठेवली जाईल, तिचेवर १२% आणि अधिक दराने दंडादाखल रिझर्व्ह बँकेला व्याज भरावे लागते. पण, पाच-सहा बँका वगळल्या, तर बाकी सर्व बँका ७% एवढी रोख रक्कम (रिझर्व्ह) रिझर्व्ह बँकेत ठेवू शकतात. स्वतःच्या इनव्हेस्टमेंट खात्यातील रकमा त्या बँका शनिवारी रिझर्व्ह खात्यात वर्ग करतात आणि पुढच्या आठवड्यात शुक्रवारच्या आत त्या रकमा पुनः इनव्हेस्टमेंट खात्यात वर्ग करतात.

बँकिंग रेग्युलेशन कायद्याच्या २४ व्या कलमाप्रमाणे, बँकांना आपल्याकडील ठेवींच्या ३२% रक्कम (२८ जूनपासून ३३ %) तरती ठेवावी लागते, म्हणजे ती रोखीत किंवा कायद्याला मान्य अशा रोख्यात ठेवावी लागते. त्यात ट्रेझरी बिलांचा समावेश आहे. तरती ठेवलेल्या रकमेचे प्रमाण, प्रत्येक शुक्रवारचे, रिझर्व्ह बँकेला कळवावे लागते. शुक्रवार संपला की शनिवारी ह्या बँका रिझर्व्ह बँकेला ट्रेझरी बिले विकतात आणि त्याची येणारी रक्कम कॅश रिझर्व्ह खाती ठेवून देतात. कायद्याचे २४ वे कलम शुक्रवारी पाळावयाचे (कारण, त्या दिवशीचे आकडे रिझर्व्ह बँकेला कळवायचे असतात.) आणि शनिवारी ते कलम मोडून ४२ व्या कलमाच्या पालनासाठी म्हणजे ७% कॅश रिझर्व्हसाठी त्याच जिंदगीच्या विक्रीच्या पैशाचा उपयोग करावयाचा. कॅश रिझर्व्ह वाढवून दाखवायचा. रिझर्व्ह-जचे ७% हे प्रमाण सबंध आठवड्याच्या सरासरीचे हवे; सोमवार ते शुक्रवार ते त्यापेक्षा कमी असले तरी आवश्यक तेवढी ट्रेझरी बिले विकून सरासरी ७% वर आणायची. रिझर्व्हची अट बँकांनी पाळली म्हणजे त्यातून रक्कम काढण्यास बँकांना परवानगी असते. त्याप्रमाणे रकमा काढून त्या पुनः ट्रेझरी बिलात गुंतवायच्या; पुढच्या शुक्रवारी तरत्या इनव्हेस्टमेंटची अट अशा रीतीने पाळली जाऊन कागदोपत्री सब ठीक होते !

वास्तविक, रिझर्व्ह बँकच ट्रेझरी बिले विकते आणि खरीदते. तेव्हा, बँका ३२% इनव्हेस्टमेंट + ७% रिझर्व्ह = ३९% चा तरतेपणा कसा दाखवतात, हे रिझर्व्ह बँकेला कळायला हवे. फक्त एका दिवशी ७% आणि दुसऱ्या दिवशी ३२% म्हणजे संबंध आठवडाभर काही बरोबर ३९% होत नाहीत.

रिझर्व्ह बँकेने कर्जपुरवठा वाढविण्यास बँकांना परवानगी दिली, परंतु ७% आणि ३२% ही प्रमाणे तशीच कायम राखली. नियमभंगाकडे काणाडोळा करून सर्व काही चालू आहे.

---

Tel. 40256

**UNITED ERECTORS**

722 A—B—17

**LAXMI PARK COLONY,**
**NAVI PETH, POONA-411030**

*We Specialise in ;*

1. Erection of Complete Sugar Factories and Distilleries.

2. Fabrication and Erection of Structural Steel.

3. 20 Years of Experience in East Africa.

बँकेतील नोकरीसाठी उपयुक्त प्रात्यक्षिक अभ्यासक्रम

**बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स**

विषय : बँकिंग, बुककिपिंग व व्यापारी पत्रव्यवहार

४४ वे सत्र ८ जुलै १९७४ पासून सुरू

मुदत : २ महिने

वेळ : सकाळी ७–३० ते ९–३०

**डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स**

७१७ बुधवार, जिजामाता बागेसमोर, पुणे ४११००२

# बदल करण्याची सिद्धता हीच यशाची गुरुकिल्ली

( सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम्. बी. ए. )

कोणत्याही उद्योगव्यवसायाचे यश किंवा अपयश तपासले असता एक गोष्ट निश्चित लक्षात येईल की जेथे जेथे व्यवसाय यशस्वी झाला तेथे तेथे त्या व्यवसायाच्या प्रमुखांनी भोवतालची परिस्थिती, ग्राहकांच्या गरजा, प्रतिस्पर्धी कंपन्यांच्या हालचाली वगैरे गोष्टी लक्षात घेऊन स्वतःच्या व्यवसायात, उत्पादनात, उत्पादनवस्तूत, प्रक्रियेत, विक्रीव्यवस्थेत कोठेतरी महत्त्वाचे व परिणामकारक बदल घडवून आणले आहेत. ज्यांना अशा तऱ्हेचे बदल योग्य वेळी करता आले नाहीत ते अयशस्वी ठरले या बदलांना इतके महत्त्व आहे की एखाद्या व्यवसायाची यशस्विता ही असे बदल घडवून आणण्याची क्षमता किती प्रभावी आहे यावरून मोजता येईल. बदल हे सुधारणेचे, प्रगतीचे आणि यशाचे प्रभावी साधन आहे, हे सर्व मान्य करूनही असे म्हणावेसे वाटते की सर्वच धंद्यांना हा बदल करणे मानवत नाही. हा बदल घडवून आणण्याची प्रक्रिया कित्येक वेळा संबंधितांना तापदायक ठरते. अशी अनेक उदाहरणे देता येतील की जिथे बदल घडवून आणणारी व्यक्ती किंवा गटच बाहेर फेकला गेला आहे. याला मुख्य कारण म्हणजे व्यक्तींचा बदलण्यास असलेला मूलभूत विरोध! अपरिहार्य बदलही अनेकदा नाराजीनेच स्वीकारला जातो. तेव्हा बदल घडवून आणणाऱ्यांसाठी काही मार्गदर्शक सूचना पुढे दिलेल्या आहेत. त्या लक्षात घेऊन जर बदल करण्याची क्रिया अंमलात आणली तर कमी त्रासात व यशस्वीपणे बदल घडवून आणता येतील.

**१. बदल आणि हेतू** – अनेक वेळा असे आढळून आले आहे की बदल हा व्यक्तींवर लादला गेला आहे. त्यामागील हेतू वा साध्य अनेकांना समजावून दिले जात नाही. यामुळे बदलाबद्दल गूढता निर्माण होते व दिशाभूल होण्याचा मोठा संभव असतो. या बदलांमुळे संबंधित व्यक्ती काळजीत पडतात. स्वतःच्या हिताविषयी त्यांना संभ्रम निर्माण होतो. उदाहरणच द्यायचे झाले तर उद्योगव्यवसायात कॉम्प्युटरचा प्रवेश हा बराचसा अशा तऱ्हेने झाला आहे. यामुळे आपली नोकरी जाईल या भीतीने अनेक काळजीत पडले व त्यांनी कित्येक ठिकाणी या प्रवेशाला प्रखर विरोध दर्शविला. काळाच्या गतीप्रमाणे कॉम्प्युटरही व्यवसायात आपले स्थान मिळवून बसला व त्यामुळे बेकार झालेल्यांचा प्रश्नही तसा समाजाला जाणवलेला नाही. पण हाच प्रवेश संबंधित कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन केल्यास त्याचे फायदे फार होतात हे फारच थोड्या व्यवस्थापकांनी जाणले.

**२. बदल आणि नियोजन**—बदल, मग लहान असो की मोठा असो, त्याचे नियोजन विशेषतः व्यवस्थापकांतर्फे आखले जाते. क्वचितच ज्यांच्या कामात बदल होणार आहे त्यांना या बदलाच्या कार्यक्रमांच्या आखणीत सहभागी केले जाते. परिणामी या व्यक्ती बदल घडवून आणण्यात स्वयंस्फूर्तीने पुढे येत नाहीत व त्यांचा विरोध जाणवतो.

**३. बदलाची हाक**—कोणत्याही बदलास व्यक्तींचा स्वभावतः विरोध असतो हे ध्यानात घेऊन बदलाची हाक ही बदलाशी निगडित असलेल्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोचणे फायद्याचे असते. व्यक्तींना जर अशा बदलामुळे स्वतःचे हित साधता येईल असे पटले तर त्या स्वयंस्फूर्तीने साद देतील व बदल घडवून आणणे सुखकर होईल. एका कंपनीची कचेरी एका ठिकाणाहून दुसरीकडे हलविणे भाग होते. यामुळे त्या कचेरीतील प्रत्येकाला त्याच्या सोयी-गैरसोयी कळवण्यास सांगितल्या व त्याप्रमाणे त्यांच्या गैरसोयींबद्दल थोडीशी आर्थिक भरपाईही मंजूर झाली. परिणामी हा जागाबदल कंपनीला तसेच कर्मचाऱ्यांनाही सुखकर वाटला. कंपनीला मोठी जागा घेता आली. नव्या ठिकाणी भाडे कमी पडले व कर्मचारीही नव्या रचनेत उत्साहाने सहभागी झाले.

**४. बदल आणि व्यक्तींचे परस्परसंबंध** — कोणत्याही विशिष्ट परिस्थितीत रोजच्या सवयींमुळे व सहवासामुळे संबंधित व्यक्तींमध्ये विशिष्ट तऱ्हेचे परस्परसंबंध व गट निर्माण होतात. हे संबंध एकमेकांना पूरक असे सहकार्याचे असू शकतात तसेच परस्परविरोधकही असू शकतात. तेव्हा ज्यांच्या कामात बदल घडवून आणावयाचा, त्यांच्या सवयी व एकमेकांचे संबंध लक्षात न घेता नवीन पद्धती अमलात आणावयाच्या म्हटल्या तर त्या अशा वातावरणात अयशस्वी ठरतात. कंपनीच्या कामकाजाच्या सोयीसाठी जर कोणा कर्मचाऱ्याची बदली करायची झाली आणि त्यामुळे त्याच्या कामाच्या सवयीत कमालीचा बदल होणार असेल किंवा त्याला नवीन सहकाऱ्यांच्या गटात बसून काम करावे लागणार असेल तर असा बदल त्याच्या स्वतःच्या किंवा त्या संबंधित गटांच्या मनाविरुद्ध लादणे धोक्याचे ठरेल. एखाद्या युनियन कार्यकर्त्याची बदली अनेक व्यवस्थापकांना डोकेदुखीचा विषय ठरली आहे.

२० वर्षे उत्पादनखात्यात काम करून प्रॉडक्शन मॅनेजर झालेल्या एका इंजिनियरला कंपनीने विक्री वाढविण्यासाठी एका दूरच्या शहरात विक्री-अधिकारी म्हणून जाण्यास सांगितले असता तांत्रिक स्वरूपाचे काम जास्त असूनही असा बदल त्या अधिकाऱ्याने नाकारला व तो कंपनीतून बाहेर पडला. बऱ्याच व्यक्तींना बदलामुळे स्वतःचा फायदा होण्यापेक्षा नुकसान होईल हीच भीती वाटते. कारण बदल जर अयशस्वी ठरला तर त्या अपयशाचे खापर बदल करणाऱ्या व्यक्तीवर फोडले जाते.

**५. बदल आणि लाभ**—बरेच वेळा बदल हा कंपनीच्या हितासाठी आहे हे पटूनही व्यक्ती बदल करण्यात पुढाकार घेत नाहीत. कारण त्यांना हा बदल घडवून आणण्यात जो बराच मानसिक व शारीरिक ताण पडतो तो नको असतो. शिवाय बदल घडून आल्यावर त्यामागच्या प्रयत्नांची किंमत विसरली जाते.

मलतेच लोक यशाचे मानकरी ठरतात. या बदलांमुळे संबंधितांच्या जबाबदाऱ्या जास्त वाढतात व व्यक्तिगत फायदे मात्र अपुरे असतात. अशा अनुभवांमुळेही बरेच जण बदल टाळतात. रोजच्या कामात प्रत्येकाला सहज रीतीने काही अशा कल्पना सुचतात की ज्यामुळे कंपनीचा लाभ होईल. पण त्या प्रमाणात त्या व्यक्तीचा लाभ होणार नसेल तर अशा कल्पना व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणल्याच जात नाहीत.

**६. बदल आणि जैसे थे !**—अनेक व्यक्ती स्वभावत: किंवा उतारवयामुळे अगर निराशावादी बनल्यामुळे 'ठेविले अनंते तैसेचि रहावे...' असे म्हणणाऱ्या असतात. यांना त्यांच्या स्वत:च्या फायद्याचा बदलही नकोसा असतो. विशेष काही न करता आपले उत्तम चालले आहे असे म्हणणारा उद्योगव्यवसायांतील इसम बहुधा आळशी तरी असावा किंवा खोटे बोलत असावा. व्यक्तीच्या खाजगी अगर व्यावसायिक जीवनात त्याला नको असला तरी बदल हा घडतच असतो. त्या बदलाला स्वहितासाठी सामोरे जाण्याची धडपड ही प्रत्येकाला करावीच लागते. त्यात यश किंवा अपयश हे त्या व्यक्तीने अनुसरलेले मार्ग व भोवतालची परिस्थिती यांवर बहुतांशी अवलंबून असते. नुसते 'जैसे थे' परिस्थिती संभाळणारा माणूस हा भोवतालच्या परिस्थितीच्या हातचे बाहुले बनतो. तो दैववादी, भविष्यवादी बनतो व परमेश्वरावर भरवसा ठेवून हेलकावे खात बसतो. प्रयत्नवादी माणसाने बदलाचे सामर्थ्य लक्षात घेऊन स्वत:च्या प्रयत्नाने आणि अक्कलहुषारीने भोवतालच्या परिस्थितीत आपल्याला अनुकूल असे बदल घडवून आणलेच पाहिजेत. शत्रू आपल्या भूमीवर चाल करून येण्याअगोदरच जो शत्रूला गाठतो तोच यशस्वी होण्याची शक्यता अधिक असते.

---

### जपानकडून माणसांच्या कवटयांची मागणी

बांगला देशाने पाकिस्तानविरोधी बंड करून स्वातंत्र्ययुद्ध पुकारले व अखेर तो यशस्वी झाला. ह्या स्वातंत्र्ययुद्धात हजारो बंगाली नागरिक मारले गेले. जपानमध्ये सध्या माणसांच्या कवटयांना फार मोठी मागणी आहे. त्यामुळे बांगला देशातून त्यांची निर्यात करण्यात येत आहे. पश्चिम जर्मनी आणि भारत ह्यांमधील एजंटांमार्फत त्या पुरविण्यात येत आहेत. जपानमधील मेडिकल कॉलेजे व डॉक्टर्स ह्यांना त्या पुरविण्यात येत आहेत.

---

**एम्प्लॉयमेंट एक्सचेंजेस कायद्यात दुरुस्ती**—पब्लिक आणि प्रायव्हेट, दोन्ही सेक्टरमधील भरती एम्प्लॉयमेंट एक्सचेंजच्याच द्वारा करणे सक्तीचे करण्यात येणार आहे. अशा एक्सेंजच्या द्वारा भरती केलेली आहे असे सर्टिफिकेट पहिल्या पगारपत्रकाला जोडलेले असल्याखेरीज ते सॅलरी बिल मंजूर करू नये, अशी सूचना ट्रेझरी ऑफिसरांना देण्यात यावी, अशी एक सूचना आहे. राष्ट्रीयीकृत बँका, पोस्ट आणि तार खाते, लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन, इत्यादींवरही हे बंधन घालण्यात यावे, असा राज्यसरकारांचा आग्रह आहे.


धनवर्धिनी
परंपरेतील
११ ४ नवीन योजना

कर्जहमी ठेव योजना
ठेव परतीचे वेळी तितकेच कर्ज मिळण्याची सुरवातीलाच हमी

विशेष सेव्हिंग्ज खाते
८:७५ टक्के व्याज, पैसे काढताना ९१ दिवसाची पूर्व सूचना.

मुदतीचे सेव्हिंग्ज खाते
७:२५ टक्के व्याज
मुदत ३ ते ६ वर्षे

मासिक व्याज ठेव योजना
किमान ९००० रु. (अथवा त्यापटीत)
कमीत कमी ६ वर्षे मुदत.

युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन

एका राज्यात शाखा असलेल्या बँकांमधील
भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कार्यालय: युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा १.

## गरीब देशांना मदत देण्यासंबंधी नाखुषी

संयुक्त राष्ट्र संघटनेचे सरचिटणीस मि. वाल्डहाइम ह्यांनी गेल्या मे महिन्यात ४५ श्रीमंत देशांना विनंतीवजा पत्र पाठविले होते. जून महिन्यापर्यंत ह्या देशांनी गरीब देशांना तातडीची मदत पाठविण्यासंबंधी आपली कितपत तयारी आहे ते त्यांनी सरचिटणीसांना कळवावयाचे होते. गरीब देशांची अर्थव्यवस्था निदान सध्याच्या अवस्थेत चालू ठेवण्यासाठी श्रीमंत देशांकडून आयात करणे अगत्याचे झालेले आहे. येत्या १२ महिन्यांत श्रीमंत देश ह्या बाबतीत काय करणार आहेत हे त्यांना जाणून घ्यावयाचे होते. म्हणजे निदान बारा महिने तरी गरीब देशांच्या अर्थव्यवस्था मोडकळीस येणार नाहीत असा हिशेब करण्यात आला होता. उत्तरे पाठविण्याची अखेरची मुदत संपल्यानंतर एका आठवड्यात सरचिटणीसांकडे अवघ्या १० देशांनी उत्तरे पाठविलेली आढळून आली. आणि त्यांपैकी काही उत्तरांत मदतीच्या प्रत्यक्ष तयारीची वार्ताही नव्हती. जगातील अनेक गरीब देशांत आज चलनवृद्धीने धुमाकूळ घातलेला आहे. त्यांना मदत करण्याच्या तातडीच्या कार्यक्रमाची अतिशय आवश्यकता आहे. तथापि ज्या देशांकडून मदत मिळण्याची शक्यता आहे त्यांची वृत्ती एक तर उदासीनतेची अगर विरोधाची आढळून आली आहे. मदतीसंबंधी सत्य परिस्थितीचे आकलन करण्यासाठी अर्जेन्टीनामधील एका प्रख्यात अर्थशास्त्रज्ञाने युरोप, उत्तर आफ्रिका आणि पश्चिम आशिआमधील देशांचा दौरा केला. त्याने मदतीसंबंधी काही अंदाज बांधला आहे.

अंदाजाप्रमाणे चढत्या व वाढत जाणाऱ्या किमतींच्या रोगाने पछाडलेल्या देशांना पुढील वर्षी सुमारे तीनशे ते चारशे कोटी डॉलर्सच्या मदतीची गरज आहे. इतकी मोठी रक्कम मिळण्याची चिन्हे मात्र दिसली नाहीत. आतापर्यंत अवघ्या ९० कोटी डॉलर्सची आश्वासने मिळालेली आहेत. अरब देशांनी त्यांच्या जवळील तेलाच्या किमती वाढविल्यापासून ते देश चांगले गबर झाले आहेत. अल्जिरिआ, कुवेत, इराण, इराक, ह्यांसारख्या देशांनी गेल्या काही महिन्यांत अमाप संपत्ती गोळा केली आहे. त्यांपैकी इराणने मागासलेल्या अविकसित देशांना मदत करण्यासाठी अरब देशांनी एक निधी उभारावा अशी सूचना केली आहे. परंतु तिला फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. आता सरचिटणिसांनी केलेल्या आवाहनालाही उपेक्षेलाच तोंड द्यावे लागत आहे. श्रीमंत अरब देशांनी आपण देऊ शकणाऱ्या मदतीविषयी निश्चितपणे काही सांगण्याचे टाळले आहे. म्हणजे मदतीचा आकडा जाहीर करून हात बांधून घेण्याची त्यांची इच्छा दिसत नाही. प्रत्येक देश, इतर देश मदतीबाबत काय धोरण स्वीकारतात ते जाणून घेण्याची वाट पाहात आहे. आता सरचिटणीस वाल्डहाइम ह्यांनी जिनीव्हा तेथे ८ जुलै रोजी एक परिषद भरविण्याची तयारी चालविली आहे. परिषदेचे स्वरूप अनौपचारिक असले तरी मदतनिधीसाठी देणगी देणाऱ्या सर्व देशांच्या प्रतिनिधींना तिचे आमंत्रण देण्यात येणार आहे. सोव्हिएट रशिआ, ब्रिटन, फ्रान्स, पूर्व व पश्चिम जर्मनी, इत्यादींनी मदतीविषयी अनास्थाच दाखविली आहे.

---

## देशाच्या अर्थव्यवस्थेतील दोषांचे दिग्दर्शन

नियोजन समितीचे एक माजी सदस्य डॉ. बी. एस्. मिन्हास देशाच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीचे निर्भीड विश्लेषण करणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'नियोजन आणि गरीब' ह्या नावाचे एक पुस्तक नुकतेच प्रसिद्ध केले आहे. त्यात ते म्हणतात की, १९६७-६८ साली आत्यंतिक दारिद्र्याच्याही रेषेखाली असणाऱ्या भारतामधील लोकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या दोन पंचमांश असावी असा अंदाज करण्यात आला होता. परंतु हे प्रमाण दोन तृतीयांशाइतके असणे अधिक शक्यतेच्या कोटीत दिसते. त्यानंतर देशाची अर्थव्यवस्था झपाट्याने घसरगुंडीला लागली आहे. आणि गेल्या २० वर्षांत चलनवृद्धीचा वारू बेलगाम उधळून स्वैरपणे धिंगाणा घालत आहे. अशा तऱ्हेची चलनवृद्धी मुळातच धोकादायक आहे. पण ज्या देशाची अर्थव्यवस्था चिखलाच्या गाड्यात रुतल्यासारखी झाली आहे तेथे तर ती अत्यंत आक्रमक अशा करपद्धतीचे स्वरूप धारण करते. त्यामुळे लोकांच्या पोटावरच प्रहार केला जातो. आज भारतात लोकांना हेच सहन करावे लागत आहे. आर्थिक क्षेत्रातील क्रांतिप्रवणता ही केवळ कागदी उद्दिष्टे ठेवण्यात असू शकत नाही; किंवा भव्य हेतूंची चित्रे रंगवूनही ती प्रत्यक्षात येत नाही. लोकांना कार्यप्रवण करण्यासाठी त्यांच्या अपेक्षा वाढविण्यात काही गैर आहे असे नाही. परंतु ह्या अपेक्षा अशा असल्या पाहिजेत की त्या फलद्रूप होण्याची शक्यता असली पाहिजे आणि त्यासाठी योग्य त्या तरतुदीही करता आल्या पाहिजेत. म्हणून अल्पकालीन आर्थिक व राजकीय निर्बंधाची आपल्याला खोल समज आली पाहिजे.

---

## कलकत्ता शहरासाठी भूमिगत रेल्वेरस्ता

औद्योगिक युगात कोणत्याही देशातील मोठ्या शहरांतून लोकसंख्येची गर्दी होत जाते आणि त्या अनुषंगाने अनेक गुंतागुंतीचे नवे प्रश्न उभे राहतात. जलद व धोकारहित वाहतुकीच्या व्यवस्था हा असाच एक प्रश्न आहे. कलकत्ता शहरातील वाहतुकीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने तेथे रशिआच्या मदतीने भूमिगत रेल्वेमार्ग तयार करण्याचे घाटत होते. आता ह्या बाबतीत उभयता देशांनी सहकार्य करण्याचे निश्चित केले आहे. सुमारे १७·५ किलोमीटर लांबीचा हा रेल्वेमार्ग डमडम रेल्वे स्टेशनपासून टॉलीगंजपर्यंत बांधण्यात यावयाचा आहे. भूमिगत रेल्वेरस्ता तयार करण्याचे काम जोखमीचे आणि भारताला तरी नवीन आहे. रशिआकडून भारताला जरूर ती यांत्रिक साधने आणि तंत्रज्ञान मिळणार आहे. काही भारतीय एंजिनिअर रशिआत जाऊन तेथील भूमिगत रेल्वेमार्गांचा अभ्यास करणार आहेत.

### चलनवृद्धीवर अर्थशास्त्रज्ञांनी सुचविलेले उपाय

जगातील अनेक देशांप्रमाणे भारतालाही चलनवृद्धीचा दुर्धर रोग जडलेला आहे. ह्या रोगावर परिणामी उपाययोजना केली गेली नाही तर सर्व देशाला भयानक परिस्थितीला तोंड द्यावे लागेल ह्याविषयी दुमत राहिलेले नाही. गेल्या फेब्रुवारी महिन्यात देशातील १४० प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनी पंतप्रधानांना चलनवृद्धीला आळा घालण्यासाठी काही उपाय सुचविले होते. आता त्यांनीच ह्या उपाययोजनेला अधिक व्यावहारिक स्वरूप देऊन पंतप्रधानांना नवी योजना सादर केली आहे. इतकेच नव्हे तर सरकारने उपाययोजना अमलात आणण्यासाठी काढावयाच्या आर्थिक वटहुकुमाचा मसुदाही सरकारकडे पाठविला आहे. सध्या देशात चलनाचा जो पुरवठा आहे त्यातील काही हिस्सा गोठवून वाढत्या किमती खाली आणता येतील अशी त्यांची कल्पना आहे. त्यांच्या मताने व्यवहारात असणाऱ्या चलनापैकी १० टक्के चलन गोठवून म्हणजेच व्यवहारातून काढून घेऊन किमतीत २५ टक्के घट घडवून आणणे शक्य आहे. शिवाय, काळ्या पैशापैकी फार मोठा हिस्साही ह्या योजनेने बाद होईल असे त्यांचे म्हणणे आहे. प्रा. ब्रह्मानंद ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे ही योजना अमलात आणण्यात आली तर आर्थिक परिस्थितीत यक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणे बदल घडून येईल. शिवाय, त्यामुळे सध्याच्या आर्थिक परिस्थितीला एकदम धक्का न बसता नव्याने घडविण्यात येणाऱ्या बदलाशी ती हळूहळू मिळती-जुळती होईल.

---

### छत्रीउत्पादन करणारी कामगारांची सोसायटी

महामुंबई छत्री उत्पादक सहकारी केंद्र, मर्यादित ह्या संस्थेने तयार केलेल्या छत्र्यांच्या विक्रीचा शुभारंभ दि. २३ मे १९७४ रोजी मुंबईचे महापौर श्री. बोमन बेहराम यांचे शुभहस्ते झाला. १९६७ साली श्री. बाबुराव शेट्ये यांचे अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या ह्या सोसायटीने उत्तम दर्जाच्या छत्र्या बनविण्याचा व्यवसाय सुरू केला असून ग्राहकांनी सुद्धा ह्या छत्र्यांचे उत्तम प्रकारे स्वागत केले आहे. ह्या सोसायटीचे २०० कामगार सभासद असून त्यांनी ५० हजार रुपयांचे भागभांडवल दिले आहे. सोसायटीला राज्य सरकारकडून आणि सहकार खात्याकडून उत्तम प्रकारे सहकार्य मिळते.

महामुंबई छत्री उत्पादक सहकारी केंद्र ही छत्री उत्पादन करणारी भारतातील कामगारांची अशी पहिलीच सोसायटी आहे. ह्या सोसायटीने गेल्या वर्षापासून छत्रीउत्पादनाचे काम सुरू केले असून चालू पावसाळ्यात ५० हजार छत्र्या विकण्याचा सोसायटीचा संकल्प आहे. सोसायटी सर्व प्रकारच्या छत्र्या तयार करीत असून नामांकित छत्रीउत्पादकांशी ती यशस्वीपणे स्पर्धा करीत आहे.

---

### हिंदी विद्यार्थ्यांना अमेरिकेत कामे मिळणार नाहीत

हिंदमधील अनेक विद्यार्थी अमेरिकेत शिक्षणासाठी जातात. त्यांच्यापैकी जे तेथील शिष्यवृत्त्या मिळवून जातात त्यांना आतापर्यंत सुटीत कामे करून पैसे मिळविता येत असत. आधीच अमेरिका हा देश महागडा म्हणून प्रसिद्ध आहे. तेथील वेतनाचे आकडे मोठे दिसले तरी प्रत्यक्ष व्यवहारात वेतनाचा बराच मोठा भाग पाहाता पाहाता नाहीसा होतो. ज्यांना अमेरिकेत कायम स्वरूपाची नोकरी अगर इतर व्यवसाय आहे, त्यांची ही स्थिती आहे. तेव्हा विद्यार्थ्यांची दशा कशी असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. आता अमेरिकेच्या संबंधित खात्याने असे जाहीर केले आहे, की जे हिंदी विद्यार्थी भारतामधून शिष्यवृत्त्यांच्या आधारावर अमेरिकेत आले आहेत त्यांनाही उन्हाळ्याच्या सुटीत तात्पुरत्या नोकऱ्या देण्यात येणार नाहीत. उन्हाळ्याच्या सुटीत विद्यार्थ्यांना कामे करूनच आपला खर्च काढावा लागतो अशी स्थिती आहे. परदेशीय नागरिकांना अमेरिकेत प्रवेश देण्याबाबत जे नियम आहेत त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना अशा नोकऱ्या करता येत नाहीत. जे तेथील नागरिक आहेत अगर ज्यांना नागरिकत्व देण्यात आले आहे, त्यांनाच नोकऱ्या देण्याचा नियम आहे. परंतु ह्या नियमांकडे अमेरिकेत आतापर्यंत फारसे लक्ष देण्यात आले नव्हते. आता मात्र त्याची अंमलबजावणी कडक रीत्या करण्यात येणार आहे. कारण, अमेरिकेत व्हिएटनाम युद्धातून परत आलेले सैनिक, काळे लोक व रेड इंडिअन्स ह्यांच्यात फार बेकारी आहे.

---

### भारतीय चित्रपटांचे कथाविषय

| कथाविषय | १९६१ | १९७२ |
|---|---|---|
| सामाजिक | १६२ | २७३ |
| गुन्हेगारी | ३० | ८२ |
| देमार, हाणामारीचे | ५ | ६ |
| साहस | २ | ३ |
| भीतिपट | — | १ |
| कल्पनारम्य | २३ | ९ |
| पौराणिक | ३२ | १६ |
| लोककथा आधारित | २६ | ५ |
| भक्तिपर | २ | ६ |
| ऐतिहासिक | १५ | २ |
| चरित्र | ५ | ३ |
| राजकीय | — | २ |
| बालचित्रपट | १ | २ |
| माहितीपट | — | ४ |
| एकूण | ३०३ | ४१४ |

---

## परदेशीय तंत्रविज्ञान पचविता आले नाही

परदेशातून उत्पादनाची नवनवीन तंत्रे आयात करून भारत प्रगतिपथावर वाटचाल करू पाहात आहे. अशा तंत्रज्ञानाची आवश्यकता कोणी नाकारत नाही. परंतु त्यांचा योग्य वापर केला जातो की नाही हा प्रश्न मात्र महत्त्वाचा आहे. नवीन उत्पादनतंत्र आयात करून त्याची देशातील विकासाशी सांगड घालण्यात यश आले नाही तर हे उत्पादनतंत्र भारताच्या गळ्यातील धोंड होण्याची भीती आहे. परदेशी उत्पादनतंत्राचा आर्थिक व शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणाऱ्या एका संशोधकांच्या संघटनेने असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, प्रगत उत्पादनतंत्राचा देशांतर्गत विकासाशी मेळ घालण्यात भारताला अद्याप तरी यश आलेले नाही. आयात तंत्रज्ञानाच्या पायावर अधिक प्रगत उत्पादनतंत्र विकसित करण्याच्या कामी ज्या प्रकारचे संशोधन व्हावयास पाहिजे ते भारतात अजून होत नाही. परदेशाकडून होणाऱ्या आयातीवर अवलंबून राहण्याचे टाळता यावे म्हणून आयातीला पर्याय शोधून काढण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. त्यामुळे बऱ्याच प्रकारच्या नवीन यंत्रसामग्रीची निर्मिती होऊ लागली हे खरे. परंतु परदेशीय तंत्रज्ञानाचा उपयोग करून स्वयंपूर्ण औद्योगिक कारखाने काढण्यासाठी लागणारे कौशल्य अद्याप विकसित झालेले दिसत नाही. अजूनही परदेशीय तंत्रज्ञानावर आधारलेले तयार कारखाने उभारण्याचीच प्रवृत्ती दिसून येते. ह्या बाबतीतला दृष्टिकोन तात्पुरती गरज भागविण्याचाच दिसून येतो. कारण, भारतामधील शास्त्रविषयक व तंत्रविषयक धोरण अद्याप बाल्यावस्थेत आहे.

परदेशी तंत्रज्ञान आयात करण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या परदेशीय चलनात सतत वाढच होत चाललेली दिसते. १८७० ह्या दशकापासून परदेशीय तांत्रिक सहकार्याने स्थापन करण्यात आलेल्या कंपन्यांनी त्यांच्या अपेक्षित उत्पादनाच्या किमतीच्या तुलनेने ४ ते ४·५ टक्के रकम तांत्रिक ज्ञानाचा मोबदला म्हणून त्या त्या देशांना पाठविली. १९६५ पासून सुरू झालेल्या पाच वर्षांच्या अवधीत हीच टक्केवारी १·२ अशी होती. काही वेळा असेही आढळून येते की तंत्रज्ञानाची आयात वाजवीपेक्षा अधिक प्रमाणात करण्यात आली. परिणाम असा झाला की त्याचा आणि उत्पादनसाधनांचा उपयोग जितका करावयास पाहिजे होता तितका करण्यात आला नाही. परदेशी तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी जी यंत्रणा लागते तिचा विकास करण्यात आला तर तंत्रज्ञानाच्या आयातीपोटी उत्पन्न होणारे प्रश्न सोडविणे शक्यतेच्या कोटीत असल्याचे दिसून येईल. आतापर्यंत तरी यंत्रांच्या नमुन्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि परदेशी उत्पादनतंत्र सुधारण्यासाठी फारसे अर्थपूर्ण प्रयत्न करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे यंत्रांच्या निर्मितीची क्षमता हळूहळू कालबाह्य होऊ पाहात आहे. सध्या यंत्रांच्या निर्मितीचे अनेक नमुने आहेत. तसेच उत्पादनप्रक्रियेच्याही अनेक पद्धती आहेत. ही विविधता कमी करून काही प्रमाणित यंत्रे ठरविता येतील व पद्धती घालून देता येतील. त्यामुळे परदेशीय तंत्रज्ञानाऐवजी देशी तंत्रज्ञान उपलब्ध होऊ शकेल. शिवाय, परदेशात तंत्रज्ञान विकत घेताना अधिक कौशल्यपूर्ण ज्ञानावर भर देता येईल.

---

## परदेशी कोंबड्यांची आयात बंद करण्याची मागणी

देशातील शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी शेतीला जोडून काही जोडधंदे करण्यात येतात. त्यात कुक्कुटपालनाच्या धंद्याला चांगले स्थान मिळालेले आहे. पण ह्या धंद्यात कोंबड्या अचानक होणाऱ्या रोगाच्या प्रादुर्भावाने मरण्याचा संभव असतो. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत हा अनुभव बराच तीव्रतेने आलेला आहे. अकस्मात उद्भवणाऱ्या रोगाच्या साथीने हजारो कोंबड्या मरण पावल्याने धंदेवाइकांचे फार नुकसान झाले. दोन वर्षांपूर्वीपर्यंत कोंबड्यांच्या ह्या रोगाचे भारतात नाव सुद्धा नव्हते. परदेशी पक्ष्यांच्या आयातीला सुरुवात झाल्यापासून हा रोग दिसून येऊ लागला आणि त्वरेने वाढीला लागला. त्यामुळे परदेशी पक्ष्यांची आयात पूर्णपणे थांबविण्यात यावी अशी मागणी धंद्यातील तज्ज्ञांकडून करण्यात येऊ लागली आहे. हा रोग इतका झपाट्याने पसरतो की काही कुक्कुटपालकांच्या खुराड्यांतील ६० टक्के पक्षी झपाट्याने मृत्युमुखी पडल्याच्या वार्ता आहेत. कोंबड्यांना रोगापासून वाचविण्यासाठी लागणारी लसही मग अधिक प्रमाणात आयात करावी लागली. त्यासाठी ९ लाख रुपयांचे परदेशीय चलन खर्च करावे लागले. चालू वर्षीही अशीच आयात करावी लागणार आहे. इज्जतनगर येथील पशुवैद्यक संशोधन शाळेत जरूर त्या प्रकारची लस तयार करण्याचे प्रयत्न जारीने सुरू आहेत. ते यशस्वी झाले तर देशी बनावटीची लस मुबलक प्रमाणात मिळू शकेल. तयार झालेली लस प्रयोग म्हणून वापरण्यात येत असून तिच्या परिणामाकडे लक्ष ठेवण्यात येत आहे.

---


## पाकिस्तानचा तेलासाठी शोध

पाकिस्तानने भूमिगत तेलाचे साठे शोधून काढण्याचे जोराचे प्रयत्न चालविले आहेत. बलुचिस्तानमधील कलात विभागाच्या ६,५०० किलोमीटर क्षेत्रफळात ह्या शोधाला विशेष जोर आलेला आहे. पाकिस्तान सायन्स काँग्रेसचे अधिवेशन भरविण्यात आले होते, त्यावेळी बलुचिस्तानचे गव्हर्नर म्हणाले की बलुचिस्तानात खनिजसंपत्ती विपुल प्रमाणात उपलब्ध होण्यासारखी आहे. परंतु तिचा उपयोग करून घेण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. रावळपिंडीजवळ तेल आढळून आले आहे. त्याशिवाय पाकिस्तानात अनेक ठिकाणी नैसर्गिक वायूही सापडला आहे. पाकिस्तानी शास्त्रज्ञांच्या मताने पाकिस्तानचा प्रदेश जगाच्या भूमिगत तेलपट्ट्यात आहे.


---

★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

**विजय पंपस्** कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.




इंजिन असो अगर इले. मोटार असो,
त्यांस "विजय" पंपाची
आवश्यकता आहेच.



कारखानदार—
**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**
फोन : ७३१
तार : Vijayplow
विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

**दर्जेदार किर्लोस्कर एंजिनांना भारतीय मानक संस्थेचे प्रमाण पत्र**
५ ते ८ हॉर्स पॉवर




प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आता भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.
१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

## इंग्लंड-जर्मनीला पैसाफंडाचा उलट आहेर!

पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगाव, च्या उत्पादनाचा ज्यांनी कायापालट घडवून आणला, त्या श्री. पी. आर. किबे ह्यांनी गुरुवार दि. २० जून रोजी हॉटेल ब्ल्यू डायमंडमध्ये पुण्यातील पत्रकारांना निमंत्रण देऊन पैसाफंड कारखाना आता निर्गत करीत असलेल्या रेल्वे सिग्नल लेन्सेसची माहिती दिली. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांनी श्री. अंताजी दामोदर काळे ह्यांच्या पैसाफंडाच्या कल्पनेस मूर्त स्वरूप देऊन पैसाफंड ग्लास वर्क्सची सुमारे ६५ वर्षांपूर्वी स्थापना केली. काचसामानासाठी परदेशांवर अवलंबून राहावे न लागता स्वदेशी काचसामानाने त्याची जागा घ्यावी, हा त्यांचा हेतू होता आणि काचधंद्यासाठी माणसे तयार करण्यास त्याने प्रारंभ केला. पैसाफंड ग्लास वर्क्सची प्रगती हळूहळू होत गेली, तरी त्याच्या उत्पादनाची विविधता अत्यंत मर्यादित होती. दर्जाही बेताचा होता. श्री. किबे ह्यांनी इंग्लंडमध्ये कित्येक वर्षे राहून ग्लास टेक्नॉलॉजीमध्ये प्रावीण्य मिळविले आणि परत आल्यावर त्यांनी आपल्या कारखान्यात आश्चर्यकारक सुधारणा घडवून आणली. आता तर हा कारखाना भारत पूर्वी जेथून साध्या काचचिमण्या आणि काचपात्रे आयात करीत असे त्या देशांकडे रेल्वे सिग्नल लेन्सेसची निर्गत करू लागला आहे. तेथील आयातदारांनी पैसाफंड कारखान्याच्या उत्पादनाची कसून चाचणी घेऊन त्यांच्या उत्कृष्टतेस मान्यता दिली आहे. प. जर्मनीकडूनही कारखान्याकडे रोड ट्रॅफिक कंट्रोल सिग्नल लेन्सेसची मागणी नोंदविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे प. जर्मनीला खास प्रकारची लँप शेड हवी आहे, त्या मागणीची किंमत १० लाख मार्क एवढी आहे. कारखान्याने थाइलंड आणि मलेशिया ह्या देशांना औषधांच्या निळ्या बाटल्या १२·५ लक्ष इतक्या पुरविल्या आहेत, आणि ४० लक्ष बाटल्यांची ऑर्डर हाती आहे. एक एक पैसा गोळा करून जमविलेल्या भांडवलाने केवढी तरी राष्ट्रीय कामगिरी चालविली आहे. जे स्वप्नातही शक्य वाटले नसते ते श्री. किबे प्रभृतींनी प्रत्यक्ष करून दाखविले आहे. तळेगाव काच कारखान्याच्या बांगड्या स्वदेशीचे व्रत म्हणून विकत घेणाऱ्या असंख्य महिलांच्या व्रतातून अशी सुफळे निर्माण झाली आहेत! पैसाफंड ग्लास वर्क्सचे भवितव्य उज्ज्वल असून ते ह्या तरुण मंडळींच्या हाती सुरक्षित आहे.

---

**औषधे फवारणाऱ्या विमानांची निर्मिती**—हिंदुस्तान एरोनॉटिक्स लि. ह्या कारखान्याने आता पिकांवर औषधे फवारणारी विमाने तयार करण्यास प्रारंभ केला आहे. त्यांची रचनाबांधणी सर्वस्वी हिंदी तज्ज्ञांनी केलेली आहे. कारखान्यातर्फे पहिल्या आठ विमानांचा गट भारत सरकारच्या शेतीखात्याला देण्यात आला.

**साठेबाजांना कैदेची शिक्षा**—साठेबाज आणि काळाबाजारवाले ह्यांचेवर आरोप सिद्ध झाल्यास त्यांना, पहिलाच गुन्हा असला तरी, कैदेची शिक्षा दिलीच पाहिजे, अशी दुरुस्ती कायद्यात करण्याचे सरकारने ठरविले आहे.

## दक्षिण अमेरिकेतील चलनवृद्धी भयानक

दक्षिण अमेरिकेतील देशांत चलनवृद्धी म्हणजे मामुली बाब होऊन बसली आहे. भारतात, युरोपमध्ये अगर अमेरिकेत चलनवाढ व तज्जन्य किंमतवाढ ह्यांचा मोठा गाजावाजा करण्यात येतो. दक्षिण अमेरिकेतील लोक ह्या प्रकाराला सरावले आहेत. चिली देशातील राहणीच्या खर्चात फक्त गेल्या वर्षी ७०० टक्के वाढ झाली. त्यानंतर गेल्या एप्रिलमध्ये त्यात आणखी ८७ टक्के वाढ झाली. युराग्वे ह्या देशात किंमतीचा निर्देशांक १९६१ साली १०० होता तो १९७३ साली ९,३३९ झाला. इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या अधिकाऱ्यांच्या मताने ही चलनवृद्धी १०,००० टक्के आहे. अर्जेंटायनात वृत्तपत्राची किंमत १९४४ पासून २००,००० टक्क्यांनी वाढली आहे. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर ज्या वृत्तपत्राची किंमत १० सेंट होती त्याची किंमत आता २०० डॉलर झाली आहे. लोकांच्या वेतनात अर्थातच वाढ झाली आहे. पण वाढीचा दर कमी आहे. त्यामुळे लोकांचे जीवन कष्टमय होत आहे.

---

## भोपाळमध्ये दुकानदारांची कुपन्स

भोपाळ येथे दुकानदारांनी काढलेली कुपन्स छोट्या किंमतीच्या नाण्याऐवजी मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येत आहेत. एखाद्या गिऱ्हाइकाने रुपया देऊन ८० पैशांचा माल खरेदी केल्यास त्याला २० पैसे परत देण्याऐवजी दुकानदार २० पैशांचे कुपन देतात. अर्थात हे कुपन त्याच दुकानावर देण्यात येते. इतर दुकानदारांनी ते स्वीकारण्याचा प्रश्नच नाही. भोपाळ शहरात छोट्या नाण्यांची टंचाई निर्माण झाल्यामुळे ह्या परिस्थितीचा दुकानदार भरपूर फायदा घेत आहेत. ह्या पद्धतीने त्यांची गिऱ्हाइकी गिऱ्हाइकाच्या इच्छेविरुद्ध वाढविता येते. जवळ पुरेशी मोड असतानाही ह्या पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. एका अर्थाने हे मर्यादित चलनच म्हटले पाहिजे.

---

## जपानमधील सिमेंटचे उत्पादन

जपानमधील सिमेंटचे उत्पादन अलीकडे झपाट्याने वाढले आहे. आता सिमेंटच्या उत्पादनात जपानचा अनुक्रम जगात दुसरा लागतो. पूर्वी अमेरिकेचा अनुक्रम दुसरा होता. सोव्हिएट रशियाचे उत्पादन जगात प्रथम क्रमांकाचे आहे. रशियात १०·९ कोटी टन सिमेंटची निर्मिती करण्यात आली.

---

## वाढत्या किमतींविरुद्ध उपाययोजना

नित्याच्या वस्तूंच्या किमती वाढत गेल्या तर ठराविक उत्पन्न असणाऱ्या लोकांना जबर तडाखा बसतो. म्हणून अलीकडे झालेल्या किंमत वाढीविरुद्ध उपाय करण्यासाठी मध्यवर्ती सरकार प्रयत्नशील आहे. फक्त वेतनवाढ रोखण्याचा उपाय पुरेसा पडणार नाही ह्याची दखल घेण्यात येत आहे.

---

### मंत्र्यांच्या परदेशप्रवासास इंदिराजींचा नकार

उन्हाळ्याच्या दिवसांत कित्येक मंत्री, उपमंत्री आणि सेक्रेटरी काहीतरी निमित्त काढून युरोपात आणि अमेरिकेत जातात. सहा मंत्र्यांना आणि नऊ सेक्रेटरींना पंतप्रधान श्री. इंदिरा गांधी, ह्यांनी परवानगी नाकारली आहे. सध्याची बिकट आर्थिक समस्या आणि परदेशी हुंडणावळीची चणचण, हे कारण त्यांनी सांगितले आहे. शिपिंगचे मंत्री श्री. राजबहादुर ह्यांनाही त्यांनी अमेरिकेची यात्रा आटोपती घेण्यास बजावले आहे. देशाच्या आर्थिक किंवा आणि राजकीय हितास अत्यंत जरूर असलेल्या दौऱ्यांनाच ह्यापुढे परवानगी दिली जाईल. श्री. यशवंतराव चव्हाणांच्या रशियाच्या दौऱ्यास (१२ दिवस) आणि श्री. स्वरणसिंगांच्या युरोपच्या दौऱ्यास (२७ जून ते ७ जुलै) परवानगी मिळाली आहे.

### ९८% कंपन्यांनी डिव्हिडंड दिले.

जानेवारी ते मे, १९७४ ह्या मुदतीत २५० कंपन्यांनी डिव्हिडंड जाहीर केले, त्यांपैकी ११२ कंपन्यांनी (४५%) डिव्हिडंड कायम राखले, तर ७८ कंपन्यांनी (३२%) डिव्हिडंड वाढविले. ३२ कंपन्यांनी (१३%) डिव्हिडंड कमी केले आणि २ कंपन्यांनी (सुमारे १%) डिव्हिडंड जाहीर केले नाही.

### मोटारींच्या किमतीत वाढ

१ जुलैपासून मोटारींच्या किमतीत बरीच वाढ झाली आहे.

| | पूर्वीची किंमत | आताची किंमत |
|---|---|---|
| अँबॅसेडर | रु. १८,३०० | रु. २२,२७७ |
| प्रीमिअर प्रेसिडेंट | रु. १७,९८० | रु. २१,६१० |
| स्टँडर्ड गॅझेल | रु. १७,८४० | रु. २१,७३८ |

म्हणजे, अँबॅसेडरची किंमत ३,९७७ रु. नी, प्रीमिअर प्रेसिडेंटची ३,६३० रु. नी आणि स्टँडर्ड गॅझेलची ३,८९८ रु. नी वाढली आहे. एक्साइज, सेल्स टॅक्स, स्थानिक कर इत्यादींचा ह्या किमतीत समावेश नाही.

नव्या किंमती १९७४ असेर अमलात राहतील; त्या वेळी पुन्हा नव्या किंमती ठरविल्या जातील.

'छोटी नाणी बंद करा'—भिक्षेकऱ्यांची मागणी— बंगलोर येथे भरलेल्या भिक्षेकऱ्यांच्या सभेने एका ठरावान्वये एक पैसा, दोन पैसे आणि तीन पैसे किमतीची नाणी बंद करण्याची मागणी सरकारकडे केली आहे. ह्या नाण्यांना व्यवहारात काहीच किंमत उरलेली नाही. सरकारी धोरण ठरविण्यात भिक्षेकरीही पुढाकार घेत आहेत, ही उत्तेजनाई गोष्ट आहे.

छोट्या उद्योगधंद्यांना मदत—स्वीडनच्या आंतरराष्ट्रीय मदत संघटनेकडून भारतामधील १६ छोट्या कारखान्यांच्या प्रकल्पाला आर्थिक व तांत्रिक साह्य मिळणार आहे. मदत तीन वर्षेपर्यंत मिळणार असून तिचा उपयोग निर्यात वाढविण्यासाठी करावयाचा आहे. मदत ३ लाख, ४० हजार डॉलर्सची आहे.


"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. ११ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. १०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**



BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**


( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth BELGAUM

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.


OUR MOTTO IS SERVICE AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*



IMPORT
SUBSTITUTE
GADRE KEYS
ALL TYPES AS
PER SPECIFICATION
GADRE BROTHERS MADHAVNAGAR
(MAHARASHTRA)
PHONE NO 2318 GRAM : "SEWA"


Swastik FOAM
cosy
sitting
pleasure!
SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003


"भिडे" ओव्हर पिक
पॉवर लूम्स ५६," ६०" व ६४"
भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि;
—सांगली—
रघुनाथराव भिडे
फोन नं. २०६९
कार्यकारी संचालक


सरदारगृह
मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमची वैशिष्ट्ये —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह
व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे
सरदारगृहात केलेले स्मारक.
फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, व्हॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेही गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड, गाऊन्स, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

TF

## ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,

क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २

१८, अपोलो स्ट्रीट, मुंबई - १.






हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो.. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)